उपसंहार

ंरगभूमी नियतकालिक हे मराठी नियतकालिकांच्या नामावलीत आपल्या स्वतंत्र वैशिष्ट्याने, वेगळेपणाने उठून दिसणारे नियतकालिक आहे. या नियतकालिकातील प्रत्येक शब्द हा मराठी नाट्यसृष्टीच्या अभ्युदयासाठी, तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी अवतरलेला आहे. हे आत्मकार्य (Self-imposed-task) समजून एका नाट्यप्रेमी, अनुभवी व्यक्तीने या नियतकालिकाचा श्रीगणेशा केला आणि १९०७ ते १९२८ या काळात अनेक अडचणींना तोंड देऊन, वाचकांपर्यंत सकस नाट्यविचार पोहोचविला. व्यावसायिक हेतू, दृष्टिसमोर न ठेवता, नाट्यविषयक तळमळीतून संपादक, श्री. शंकरराव मुजुमदार यांनी ही धडपड केली, ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे.

रंगभूमी नियतकालिक हे प्राधान्याने, श्री. शंकरराव मुजुमदार यांचेच कर्तृत्त्व आहे. हे नियतकालिक सुरू करताना, संपादक म्हणून त्यांच्याजवळ काही जमेच्या गोष्टी होत्या, तर काही अडचणीही होत्या, किर्लोस्कर नाटक मंडळीचे ते व्यवस्थापक असल्याने, तिच्या कीर्तीचे वलय त्यांच्या पाठीशी होते. तिचे कर्तबगार संपादक या नात्याने समाजात प्रतिष्ठा होती. त्यांना स्वत:ला लेखनानुभव होता. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या प्रयोगांनिमित्त गावोगावी जावे लागत असल्यामुळे या क्षेत्रातील अनेक माणसांशी सलोख्याचे नाते जोडण्याची संधी मिळालेली होती. पण नियतकालिकाचे संपादन करीत असताना यापैकी काही गोष्टी अडचणीच्याही ठरत होत्या. सतत दौरे करावे लागत असल्यामुळे या नियतकालिकाची कचेरीही फिरती असे. अंक अनियमितपणे प्रसिद्ध होत. लेखकांकडून येणाऱ्या मजकुरावर संपादकीय संस्कार झालेले आढळत नाहीत याचे कारण अस्थैर्य हे होते. लेखातील काही मते पटली नाहीत किंवा लेखांत काही दोष आढळले की संपादक लेखाच्या शेवटी स्वत:ची टिप्पणी देत, परंतु ते दोष दूर करून लेख छापीत नसत. अनेक लेख भागश: प्रसिद्ध होत. त्यांना क्रमवार, स्वतंत्र पृष्ठक्रमांक देत. त्यामध्ये कधी कधी, दोन भागात काळाचे अंतर खूप पडत असे. एका अंकातला, एखाद्या लेखाचा अपूर्ण भाग तेवढ्यापुरता संपविताना वाक्य पुरे होऊ देण्याची खबरदारीही घेतली जात नसे. मध्येच वाक्य तोडून तो लेख तेथेच थांबविला जात असे. मुद्रणदोष तर खूपच असत. त्या

काळातील मुद्रणकलेच्या मर्यादा आणि अक्षरजुळणी करणाऱ्यांचा (कंपोझिटर्सचा) अशिक्षितपणा ही कारणे सुद्धा त्याला होती. पण एकूणच या नियतकालिकात संपादकीय साक्षेप कमी आळढतो याला कारण अपुरा वेळ आणि अस्थिरता हेच होते. व्यवसायबंधूंनी या नियतकालिकाला कोणतेही सहकार्य दिले नाही किंबहुना त्यांनी उपेक्षाच केली होती असे श्री. मुजुमदार यांच्या संपादकीयांवरून दिसते. वर्गणीदारांची संख्या कमी, वर्गणी वेळेवर पाठविणारे कमी अशा परिस्थितीत आत्म-कार्य समजून आर्थिक नुकसान सोसून हे नियतकालिक त्यांनी चालविले ही गौरवास्पद घटना आहे.

या नियतकालिकात लेखन करणाऱ्या लेखकांचा विचार केला तर, ज्यांचे लेखन यात यावयास हवे होते अशा काही लेखकांच्या नावांची अनुपस्थिती जाणवते. श्री. कृ. कोल्हटकर हे अन्यत्र, समीक्षा लेखन करीत आलेले होते. परंतु येथे मात्र दोन प्रस्तावनांखेरीज आणि एका वादग्रस्त विषयासंबंधी मत व्यक्त करण्याखेरीज इतर काही लेखन त्यांनी केलेले नाही. गो. ब. देवल, कृ. प्र. खाडिलकर यांचेही लेखन या नियतकालिकात आढळत नाही. कृ. प्र. खाडिलकर यांची ऑगस्ट १९०७ च्या पहिल्या अंकाला फक्त प्रस्तावना घेतलेली आहे. श्री. देवल, व श्री. खाडिलकर हे दोघे श्री. कृ. कोल्हटकर यांच्याप्रमाणे परीक्षणात्मक किंवा नाट्यचिंतनात्मक लेखन करणाऱ्यांपैकी नव्हते ही गोष्ट खरी, पण मुजुमदार त्यांना लेखनप्रवृत्त करू शकले असते. नाट्यदेवतेचीच पूजा करण्याचे व्रत घेतलेल्या रंगभूमीसारख्या नियतकालिकात, या श्रेष्ठ नाटककारांची अनुपस्थिती जाणवते. राम गणेश गडकरी यांनी सुरुवातीच्या काळात मुजुमदार यांना संपादनसाहाय्य केले होते. ‘ सवाई नाटकी ’ या टोपणनावाने त्यांनी यात लेखनही केले. परंतु पुढे मात्र गडकरी, कोल्हटकर, खाडिलकर या तिघांशी काही ना काही कारणाने श्री. मुजुमदार यांचे संबंध दुरावले. कदाचित त्याचा परिणाम असेल, परंतु ज्या काळात हे संबंध चांगले होते, त्या काळात तरी कोल्हटकर, देवल, खाडिलकर यांची एखादी मुलाखत, अनुभवकथन, एखाद-दुसरा विचारप्रवर्तक लेख घेणे अशक्यप्राय नव्हते. राम गणेश गडकरी यांचा नाटककार म्हणून लौकिक १९११ पासून पुढील काळात झाला. पण देवल, कोल्हटकर, खाडिलकर हे तिघेही या नियतकालिकाच्या जन्माच्या वेळीच नाटककार म्हणून मान्यता पावलेले होते. निदान दुसऱ्या-तिसऱ्या वर्षाच्या अंकांपासून केव्हातरी त्यांचे लेखन यावयास हरकत नव्हती.

श्री. मुजुमदार यांनी या नियतकालिकात लिहिलेली नट, नाटककार यांची चरित्रे, ही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी आहे. परंतु त्यांनी लिहिलेल्या या चरित्रांमध्ये कृ. प्र. खाडिलकर यांचे चरित्र नाही. तसेच बालगंधर्वांसारख्या, कीर्तीच्या शिखरावर असलेल्या श्रेष्ठ नटाचे चरित्रही नाही. व्यक्तिगत संबध दुरावले असल्याचा हा परिणाम असेल का संपादक या दृष्टिकोनातून जर श्री. मुजुमदार यांच्या या निर्णयाकडे पाहिले तर, त्यामुळे रंगभूमी नियतकालिकाला काही अंशी अपुरेपणा आला आहे असे म्हणावेसे वाटते.

या नियतकालिकातील अशा काही उणीवा नजरेपुढे आल्या तरी मराठी नियतकालिकाच्या इतिहासात, रंगभूमी नियतकालिकाचे स्थान एकमेवाद्वितीय असेच आहे. नाटक या विषयावरचे मराठीतील पहिले सचित्र नियतकालिक म्हणून मराठी नियतकालिकांच्या इतिहासात त्याला आगळे स्थान आहे.

रंगभूमी नियतकालिकपूर्व व समकालीन अशा ज्या नियतकालिकात, नाट्यविषयक लेख येत असत अशी प्रमुख नियतकालिके व वृत्तपत्रे म्हणजे विविधज्ञानविस्तार, निबंधचंद्रिका, केरळकोकिळ, चित्रमयजगत्, केसरी, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश इत्यादी. होत. यातील नाट्यविषयक लेख मौलिक असत, परंतु नाटक या विषयाची सातत्याने, सर्वांगीण चर्चा, रंगभूमी नियतकालिकातच दिसते. वाचकांची अभिरुची घडविण्याची, नाट्यविषयक नवी प्रेरक जाणीव देण्याची जी ताकद रंगभूमी नियतकालिकातून व्यक्त झालेली दिसते ती अभूतपूर्व आहे. नाटक या एकाच कलाप्रकाराचा ध्यास घेऊन एखादे नियतकालिक सुरू करणे ही गोष्ट नवलाईची होती. आज मराठी रंगभूमी कितीतरी प्रगत झाली आहे, तरीही अशा प्रकारचे एकही नियतकालिक सातत्याने चालू असलेल दिसत नाही. रंगभूमी नियतकालिकाच्या प्रकाशनात १९१७ ते १९२७ या काळात खंड पडला, तेव्हाही, अन्य कोणाला असे नियतकालिक चालविण्याचे धाडस झाले नाही. म्हणूनच संपादकांच्या व पर्यायाने या नियतकालिकाच्या मर्यादा ध्यानात घेऊन सुद्धा, त्यांच्या कार्याचे मोल मान्य करावे लागते.

नाट्यचर्चा हे रंगभूमी नियतकालिकाचे एकमेव ध्येय होते, तसे अन्य नियतकालिकांचे नव्हते. प्रयोगसमीक्षा आणि नाटक-एक व्यवसाय यादृष्टीने विचार या दोन पैलूंवर यात विशेष भर दिसतो. सर्वसामान्य प्रेक्षकांनी, नाट्यप्रयोग पाहून व्यक्त केलेली मते हे या नियतकालिकाचे वैशिष्ट्य आहे. प्रेक्षक हा नाट्यव्यवहारातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे

ही जाणीव यात जागोजागी व्यक्त झालेली आहे. नाट्यलेखन आणि प्रयोगनिर्मिती यामागील प्रमुख सूत्रधार प्रेक्षक हाच असतो. तो अप्रत्यक्षपणे नाटक घडवीत असतो. नाटककाराला, प्रयोगासाठी उपलब्ध असलेल्या समकालीन नटांचा जसा विचार करावा लागतो, तसा प्रेक्षकांच्या आवडीनिवडीचा, अभिरुचीचा विचारही करावा लागतो. ही वस्तुस्थिती यात मांडली गेली आहे. रंगभूमी नियतकालिकाच्या ध्येयधोरणाशी ते सुसंगत आहे. नाटक ही एका बाजूने वाङमयीन कलाकृती असते तर दुसऱ्या बाजूने प्रयोगाच्या अंगाने तो व्यवसायही असतो. या दोन्हीची सांगड घालण्याचा संबंध प्रेक्षकांच्या अभिरूचीशी असतो. म्हणून वरच्या दर्जाची अभिरुची घडविण्याचे ध्येय संपादकांनी मनाशी बाळगलेले आहे. सर्वसामान्य प्रेक्षकांना, नाट्यप्रयोगांवरील प्रतिक्रिया, मते, व्यक्त करण्यास संधी देणे ही गोष्ट या नियतकालिकात जाणीवपूर्वक केलेली आहे. आजसुद्धा सर्वसामान्य प्रेक्षकांच्या मताभिव्यक्तीला इतके महत्त्वाचे स्थान कोणत्याही नियतकालिकाने दिलेले दिसत नाही.

अन्य नियतकालिकांच्या तुलनेने, रंगभूमी नियतकालिकाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. प्रेक्षकांच्या अभिरुचीच्या जडणघडणीबरोबरच, नटांचे वर्तन, नटांचे शिक्षण, नटांची व्यसनाधीनता, नाटकमंडळ्यांची फाटाफूट यासंबंधीचे विचार यात परखडपणे परंतु तळमळीने व्यक्त केलेले आहेत. समाजात नटांना प्रतिष्ठा नाही. नट हे फक्त करमणुकीचे साधन, व्यक्ती म्हणून त्यांना समाजात मान नाही हे कटु सत्य संपादकांना मनोमन डाचत होते असे स्पष्ट दिसते. या परिस्थितीला कारण त्या काळातील समाजमन, त्याच्या नीतिकल्पना हे जसे होते, तसेच नटांचा अशिक्षितपणा, त्यांच्या ठिकाणी दिसणारा सुसंस्कृतपणाचा अभाव हेही होते. ही गोष्ट मान्य करण्यावाचून गत्यंतर नव्हते. म्हणून नटांच्या, सर्व प्रकारच्या शिक्षणाचा विचार यात येतो. गणित, भाषा इत्यादी. विषयांचे शिक्षण, आपल्याला नाट्यव्यवसायात मिळणाऱ्या पैशांचा विनियोग कसा करावा यासंबंधीचे शिक्षण, कलेचे, विशेषत: अभिनयाचे शिक्षण नटांना देणे अत्यंत आवश्यक आहे. अशा स्वरूपाचे विचार या नियतकालिकात आलेले आहेत. संपादकांची दूरदृष्टी त्यात दिसून येते. नटांमध्ये या सुधारणा झाल्याशिवाय त्यांना नट म्हणून आणि व्यक्ती म्हणून समाजात मान्यता मिळणे कठीण आहे. ही गोष्ट ते जाणून होते. नाटकातील आपली भूमिका समजून करता येण्यासाठी वाचन, अभ्यास, चर्चा अशा बौद्धिक परिश्रमांचीही गरज असते ही जाणीव या नियतकालिकात उत्कटतेने व्यक्त झाली आहे. नाटक मंडळ्यांमधील फाटाफुटीचा संबंध एका बाजूने नाट्यव्यवसायाशी होता तर दुसऱ्या बाजूने नटांच्या नाट्यनिष्ठेशी होता. एकाच नाटक मंडळीत स्थिर न राहाता, सारख्या नाटक मंडळ्या बदलण्यात, नटांची,

नाट्यनिष्ठा शबल होते आणि परिणामी, नाट्यकलेची, नाट्य-व्यवसायाची गुणवत्ता कमी होते. या गोष्टीची नटांना जाणीव देणे रंगभूमी नियतकालिकाला आवश्यक वाटलेले आहे. तसेच नाटक-मंडळ्यांच्या रचनेचा फेरविचारही करावासा वाटलेला आहे. नाट्यव्यवसायातील राजकारण आणि अर्थकारण यांचे भान यामागे आहे. या दोन गोष्टींवर ताबा असल्याशिवाय नाट्यकलेचा विकास होणार नाही. ही गोष्ट, नाट्यक्षेत्राशी प्रदीर्घ काळ संबंध असलेल्या संपादकांना उमगलेली होती. म्हणूनच या कलेच्या सामूहिक स्वरूपाचे भान ते सतत जागते ठेवीत होते. नाट्यलेखन, नाट्यप्रयोगनिर्मिती आणि नाट्यव्यवसाय या गोष्टी परस्परपूरक, परस्परपोषक आहेत. यापैकी एखादा दुवा कच्चा असेल तर त्याचा परिणाम कला व व्यवसाय या दोन्हीवर होतो. म्हणून सामूहिक जबाबदारीचे तत्त्व, या क्षेत्रातील सर्व घटकांच्या मनावर ठसविण्याचा या नियतकालिकाचा हेतू दिसतो. ज्यांच्यासाठी हा सारा व्याप असतो, ते प्रेक्षकही, सामुदायिकरित्याच नाट्यप्रयोगाचा आस्वाद घेणारे असतात. नाटककार, नट, नाटक मंडळ्यांचे मालक, प्रेक्षक, समीक्षक या सगळ्यांमध्येच एकसूत्रीपणा हवा ही जाणीव यात दिसते. रंगभूमी नियतकालिकातून चिकाटीने, सलगपणे, सतत अशा प्रकारचे जे विचार व्यक्त झाले त्यांचा वाचकांच्या मनावर निश्चितपणे संस्कार घडला. स्वत:चे नाट्यविचार व्यक्त करावयास सर्वसामान्य वाचक-प्रेक्षकांना बळ प्राप्त झाले. अभ्यासू विद्वानांबरोबरच त्यांचेही विचार प्रसिद्ध करून या नियतकालिकाने सर्वसामान्य प्रेक्षकांनी आत्मसन्मानाची भावना जागविण्याचे कार्य केले. त्यामुळे यातील नाट्यविचारांचे, नाट्यसमीक्षेचे स्वरूप व्यापक बनलेले दिसते.

नाटक या विषयाचा विचार किती अंगांनी करता येतो, करावा लागतो, याचे उत्तम दिग्दर्शन या नियतकालिकाने केले आहे. या व्यवसायातील, जवळजवळ प्रत्येक घटकाला, काही ना काही मूलभूत विचार या नियतकालिकात वाचावयास मिळेल. नाटकाची उत्पत्ती, नाट्यकलेचा इतिहास, नाट्यलेखन अशा विषयांवरील लेख अर्थातच माहितीपर, तत्त्वचिकित्सापर असे आहेत. श्री. गो. वा. बापट यांच्या ' नाट्यविषयक व्यापक विचार या लेखाला '' नाटकविषयाची केवळ गीता ' असे म्हटले गेले आहे ते यथार्थ आहे. कारण या लेखात पायाभूत स्वरूपाचे विचार सोदाहरण व्यक्त केलेले आहेत. हा लेख म्हणजे या नियतकालिकाची मोठीच जमेची बाजू आहे असे म्हणावेसे वाटते. भरताच्या नाट्यशास्त्रातील तत्त्वे या लेखात आधुनिक परिभाषेत मांडली गेली. पौर्वात्य व पाश्चिमात्य नाट्यसंकल्पनांच्या एकत्रीकरणातून, मराठी नाट्यसमीक्षा समृद्ध करण्याचा प्रयत्न केला गेला. पाश्चात्य नाट्यसमीक्षेतील विशिष्ट पारिभाषिक संज्ञांचा मूळ अर्थ समजावून घेऊन

त्याला मराठी प्रतिशब्द निर्माण करण्याचा प्रयत्न या लेखात झाला. या लेखात वापरलेले मराठी प्रतिशब्द आज मान्य होण्यासारखे नाहीत. परंतु असा प्रयत्न त्या काळात झाला, करावासा वाटला एवढे श्रेय निश्चितच द्यावे लागते.

' आमचे खरे गुरुकुल म्हटले म्हणजे आमचे संस्कृत नाटककार होत. ' आणि '' शेक्सपीअर हा आम्हास गुरुस्थानी आहे. ' ही श्री. गो. वा. बापट यांची दोन विधाने तत्कालीन मराठी समीक्षेच्या स्वरूपाचे उत्तम दिग्दर्शन करतात. कालिदास-भवभूती आणि शेक्सपीअर या दोन्हीच्या मध्ये आपली मराठी नाट्यरचना, नाट्याभिरुची, नाट्यसमीक्षा हेलकावत असल्याचे चित्र दिसते. तत्कालीन नाटककारांची, समीक्षकांची नाट्यनिष्ठाच मुळी अशी विभागली गेलेली दिसते. समस्या, आपल्या भूमीतील वास्तवाशी इमान राखणाऱ्या, तंत्र शेक्सपीअरचे आणि वातावरण थोडे फार तरी संस्कृत नाटकांच्या जवळ जाणारे असे मराठी नाटकांचे स्वरूप दिसते. संस्कृत नाट्यवाङ्मय आणि नाट्यशास्त्र हे आपले पूर्वसंचित. आपले धन. आपला वारसा. आणि तो पाठीशी घेऊन जे आदर्श शिखर गाठावेसे वाटत होते, ते शिखर म्हणजे शेक्सपीअर. रे.टिळक यांनी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात, भारतात लौकरच शेक्सपीअर जन्माला येईल असा आशावाद प्रगट केला, याचा अर्थही तोच आहे. एकीकडे कालिदासाची अभिजातता मोह घालीत होती, आत्मिक समाधान देत होती तर दुसरीकडे शेक्सपीअर वास्तवाचे रंग प्रभावीपणे दाखवीत होता. मराठी नाट्यसृष्टीला हा एक सांस्कृतिक हादरा होता आणि या परिस्थितीत, दोलायमान अवस्थेत मराठी नाटक आणि मराठी समीक्षा घडत होती. या वस्तुस्थितीच्या खुणा रंगभूमी नियतकालिकात पाहावयास मिळतात. यातील तत्त्वचिकित्सेचे स्वरूप दुहेरी दिसते ते यामुळेच संहितासमीक्षेच्या बाबतीतही हीच वस्तुस्थिती प्रभावी दिसते.

संस्कृत नाटकांच्या रसास्वादाशी आणि मूल्यमापनाशी समरस झालेले मन, तितक्या प्रमाणात मराठी नाटकांकडे ओढले गेलेले नाही. इंग्रजी नाटकांकडे, एक नवीन अभ्यासक्षेत्र म्हणून मर्यादित कक्षेत लक्ष वळविले आहे. संस्कृतमधील अभिजात कृतींनी समीक्षकांना खिळवून ठेवले. पण ही बुद्धिमत्ता, गुणग्राहकता, रसिकता मराठी नाट्यसंहितांच्या परीक्षणांकडे कमी प्रमाणात वळली. मराठी नाटकाच्या जन्माला फार वर्षे लोटलेली नव्हती. हे त्याचे एक कारण होते. कलाकृतीवरील चांगली समीक्षा निर्माण व्हावयास, तिच्या जन्मानंतर पुरेसा काळ लोटावा लागतो. समकालीन समीक्षेच्या काही मर्यादा असतात हे

जरी खरे असले तरी, ज्या मराठी नाटकांवर कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चा चालू होती, ज्यांनी लोकमानसात स्थान मिळविले होते, अशा नाटकांवरही काही अपवाद वगळता, सखोल परीक्षणे आलेली नाहीत. या नियतकालिकात समकालीन मराठी नाटकांवर मौलिक परीक्षणलेख संख्येने कमी आहेत, मान्यवर परीक्षण लेखकांची संख्याही कमी आहे. जी मराठी नाटके स्थिरावून, गाजून १५ ते २५ वर्षांचा काळ लोटलेला होता, त्या नाटकांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन रंगभूमी नियतकालिकात यावयास हवे होते. तत्कालीन विद्यापीठीय विद्वानांची विशिष्ट अभिरुची हे याचे कारण दिसते. पौर्वात्य व पाश्चात्य अभिजात नाट्यकृतींच्या संस्कारांमधून ज्यांची नाट्याभिरुची घडलेली होती त्यांना मराठी नाटक आव्हानात्मक वाटत नव्हते. संस्कृत व इंग्रजीतील नाटके डोळ्यांपुढे ठेवून नाट्यसमीक्षातत्त्वांचा अभ्यास केलेला होता. महाविद्यालयीन विद्यार्थी ज्या नाटकांचे प्रयोग करीत असत ती नाटके संस्कृत, इंग्रजी किंवा रूपांतरित नाटकेच असत. या परिस्थितीमुळे मराठी नाटकांचे, नाट्यसमीक्षेचे नुकसान झालेले आहे. नाटक या विषयासाठीच अवतार घेतलेल्या रंगभूमी नियतकालिकाने, या वस्तुस्थितीकडे लक्ष पुरवावयास हवे होते. तत्कालीन नाट्याभ्यासकांचा विशिष्ट कल ध्यानात घेऊन त्यांना आग्रहाने, जाणीवपूर्वक, मराठी नाटकांच्या समीक्षणाकडे वळविण्याचा प्रयत्न संपादकांनी करावयास हवा होता, पण तसे घडलेले दिसत नाही.

नटांचे शिक्षण, नाटकमंडळ्यांमधील फाटाफूट, प्रेक्षकांची अभिरुची इत्यादी. विषयांतून रंगमंचीय आविष्काराची आणि त्याच्या आस्वादाची जाण दिसते. या स्वरूपाच्या लेखांमधून नाट्यक्षेत्राच्या शुद्धीकरणाचे कार्य घडलेले आहे.

नाट्यविषयक तत्त्वविचार, सौंदर्याकलन आणि नाट्यव्यवसाय अशा सर्वांगीण अभ्यासातून नाट्यकलेच्या सामूहिकत्वाची जाणीव व्यक्त केली गेली हे या नियतकालिकातील नाट्यसमीक्षेचे वैशिष्ट्य आहे. नाट्यक्षेत्राचे आदर्श स्वरूप प्रस्थापित करण्याचा प्रयत्न या नियतकालिकाला करावयाचा होता. सर्वस्पर्शित्व हा घटक यात प्रभावी दिसतो तो त्यामुळेच वाचकांच्या नाट्यविचाराला सतत खाद्य पुरविणे आणि अभिरुचिसंपन्नता निर्माण करणे हे कार्य रंगभूमी नियतकालिकाने निष्ठेने केलेले आहे.

रंगभूमी नियतकालिकाने नाट्यविषयक जे विचारमंथन सुरू केले, या क्षेत्रातील व्यक्तींना विशिष्ट दृष्टी देण्याचा जो प्रयत्न केला, त्याची दखल समकालीनांनी घेतलेली दिसत नाही.

या समकालीनांमध्ये वृत्तपत्रे, नियतकालिके यांचे संपादक, नाटकमंडळ्यांचे मालक, नट, बहुसंख्य वाचक अशा साऱ्यांचाच समावेश करावा लागतो. समव्यावसायिकांनी या नियतकालिकाला कोणतेही साहाय्य केले नसल्याचा उल्लेख संपादकांनी केलेला आहे. वर्षाला अडीच रुपये ही वर्गणी जबर असल्याची तक्रार करणाऱ्या वाचकालाही त्यांनी खडसावले आहे. वर्गणीदारांची संख्या वाढावी म्हणून पुन:पुन: आवाहन केले आहे. आपण हाती घेतलेल्या कार्याविषयीचा संपादकांचा आत्मविश्वास यात दिसून येतो, पण या कार्याचा परिणाम आणि त्याच्या वेगळेपणाची जाणीव मात्र समकालीनांना फारशी दिसत नाही.

केसरीकारांनी, किर्लोस्कर नाटक मंडळीला मदत केली होती, नाटकांच्या जाहिरातीही केसरीत येत असत, परंतु 'रंगभूमी सारखे एखादे नियतकालिक सुरू झाले आहे याची बातमी १९०७ मधील केसरीच्या कोणत्याही अंकात नाही. १९२७ मध्ये जेव्हा हे नियतकालिक पुन: नव्याने सुरू झाले त्यावेळी मात्र त्याची बातमी केसरीत आलेली आहे. याचा अर्थ या नियतकालिकाच्या ध्येयवादित्वाची, कार्याची फारशी ओळख पटलेली नव्हती. त्याकाळातच नव्हे तर पुढेही बराच काळपर्यंत त्याच्या वाट्याला उपेक्षाच आली.

आजच्या नाट्यक्षेत्रातील विविध उपक्रम किंवा त्यासंबंधीचे विचार या नियतकालिकात बीजरूपाने आढळतात. उदाहरणार्थ नाट्यप्रयोगाशी निगडित अशा विविध अंगांचे शिक्षण देण्यासाठी नाट्यशिक्षणसंस्था असणे आवश्यक आहे हा विचार यात आलेला आहे. नाट्यशिबिरे, नाट्यचर्चा, नटांना वृद्धापकाळी मदत देऊ शकणाऱ्या एखाद्या संस्थेची किंवा निधीची गरज याबाबतचे विचारही यात आहेत. नाटकातील देखावे, रंगभूषा, वेषभूषा यासंबंधी सर्वसामान्य प्रेक्षकांनी व जाणकारांनी यामध्ये केलेली चर्चासुद्धा मूलभूत स्वरूपाची आहे म्हणूनच ती कोणत्याही काळात अभ्यासली जाण्यासारखी आहे. तरीही हे नियतकालिक बंद पडल्यावरसुद्धा, पुढे तीस-पस्तीस वर्षे त्याकडे दुर्लक्ष झाले. ही वस्तुस्थिती नोंदवावीशी वाटते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाशी ज्या विचारांचे नाते जुळू शकेल असे विचार आणि नवनवीन कल्पना या शतकाच्या पूर्वार्धातच यात आल्या आहेत. वर सांगितलेल्या नवीन विचारांखेरीज, आणखी काही गोष्टी यात आढळतात. उदा. बालरंगभूमी अस्तित्त्वात येणे आवश्यक आहे हा विचार त्रोटक स्वरूपात का होईना, या नियतकालिकात येऊन गेलेला आहे.

सामाजिक बांधिलकी या शब्दात आज अभिप्रेत असणाऱ्या तत्कालीन कृतींचा गौरव या नियतकालिकाने अनेकदा केलेला आहे. नाटकाच्या प्रयोगाचे उत्पन्न पैसाफंडासाठी, देवळाच्या जीर्णोद्धारासाठी, ग्रंथालयाच्या इमारतनिधीसाठी दिले गेल्याच्या वार्ता यात हेतुपूर्वक दिलेल्या आहेत. नाट्यव्यवसायी व्यक्तींच्या मनातील सामाजिक ऋणाची भावना वाढीला लागावी हा यामागील हेतू होता, तसेच सुशिक्षित, सुसंस्कृत समाजाच्या मनात, नटवर्गाबद्दल, नाट्यव्यावसायिकांबद्दल आपुलकी निर्माण व्हावी हासुद्धा उद्देश होता. अशा छोट्या-मोठ्या गोष्टींतून या नियतकालिकाने केलेले प्रबोधन उपेक्षिले गेले याची खंत वाटते. प्रस्तुत प्रबंधात, नाट्यसमीक्षा या पैलूवर लक्ष केंद्रित करून, रंगभूमी नियतकालिकाच्या कार्याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे.

अभ्यासाअंती हाती आलेले, प्रबंधविषयाच्या संदर्भातील ठळक निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत :-

१. रंगभूमी नियतकालिकाचा जन्म या घटनेला मराठी नियतकालिकांच्या इतिहासात आणि मराठी नाट्यसमीक्षेच्या इतिहासात विशेष अर्थ आहे.

२. नाट्यसमीक्षा हा, या नियतकालिकाचा गाभा आहे.

३. या नियतकालिकाने केवळ नाट्यसंहिता, नाट्यप्रयोग यांचीच समीक्षा केली नसून एकूणच नाट्यक्षेत्राची समीक्षा केलेली आहे.

४. नाट्यक्षेत्राचे शुद्धीकरण आणि आदर्शांचे संस्थापन हे या समीक्षेमागील प्रमुख सूत्र आहे.

५. नाट्यविषयक अभिरुचीची जडणघडण करणे आणि सर्वांगीण स्वरूपाचा नाट्यविचार वाचकांपुढे मांडणे हे या नियतकालिकाचे उद्दिष्ट आहे.

६. सर्वसामान्य प्रेक्षकांनी केलेली विपुल प्रयोगसमीक्षा हा या नियतकालिकातील वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे.

७. नाट्यकलेच्या सामूहिकत्वाची जाणीव या नियतकालिकात सातत्याने व्यक्त झाली आहे.

८. नाटकविषयक व्यापक विचार हा, श्री. गो. वा. बापट यांचा लेख, भरतमुनींच्या नाट्यशास्त्राचा, प्रो. चिं. गं. भानु यांनी केलेला मराठी अनुवाद, संपादक श्री. शं. बा. मुजुमदार यांनी लिहिलेली नट व नाटककारांची चरित्रे, पाश्चात्य नट, नाट्यगृहे यांकडे त्यांनी वेधलेले लक्ष ही मराठी नाट्यसृष्टीला, या नियतकालिकाने दिलेली देणगी आहे.

९. किर्लोस्कर नाटकमंडळीचे व्यवस्थापक असलेल्या श्री. शंकरराव मुजुमदार यांनी या नियतकालिकाद्वारे श्री. आण्णासाहेब किर्लोस्कर यांचेच कार्य व्यापक दृष्टीने व प्रभावीपणे आकाराला आणण्याचा प्रयत्न केला आहे. हे नियतकालिक म्हणजे प्राधान्याने श्री. शं. बा. मुजुमदार या व्यक्तीचेच कर्तृत्त्व आहे.

१०. श्री. मुजुमदार यांनी, प्रतिकूल परिस्थितीत, ज्या निष्ठेने, तळमळीने हे नियतकालिक चालविले त्यामानाने, त्याच्या कार्याचे मोल जाणून घेण्याचा प्रयत्न झाला नाही.